# अवनी

अवनी म्हणजे धरती. सुजलाम सुफलाम करणारी. सर्वांना सांभाळणारी. त्यांचे पालन पोषण करणारी अशीच माझी छोटीशी दहा वर्षांची नात. लहान पण महान. तीला घरातल्या सर्वांची काळजी. सदा हसतमुख उत्साही. घरात आनंद आणि उत्साह निर्माण करणारी जणू चैतन्याचा झरा. आता आमच्या ह्या लाडक्या बाई सध्या अमेरिकेला गेल्या आहेत. पण जाताना आजी-आजोबांचा आनंद घेऊन गेल्या. घरात एकदम शांतता, सुनसुनाट झाला. आजोबांच्यावर जास्त परिणाम झाला. ते काही सांगत-बोलत नाहीत, पण ती नसल्याने त्यांना अजिबात करमत नाही. आणि त्यांच्या अनेक शारिरीक तक्रारी सुरु झाल्या. आजी मात्र कशा-बशा सावरल्या.

आता तीची आणि नातवाची भेट मोबाईलवरच! त्यांचे व्हिडीओ कॉल आले म्हणजे आम्हाला सलाईन लावल्याप्रमाणे पुन: ताजे तवाने झाल्या सारखे वाटते. तो दिवस आनंदात जातो. अशा आमच्या अवनी ने आपल्या हस्तलिखिता साठी दोन चित्रे काढून पाठविली आहेत. सर्वांना आवडतील अशी आशा आहे.

सौ. सुनंदा शा. दीक्षित.
सुरुची अपार्टमेंट, कोथरुड पुणे.